लोकमत

# सिटी इंटनॅशनल शाळेचा निकाल शंभर टक्के



श्रेयस बच्छाव



अवंतिका व्यंकटेश



रिचा शानबाग



अनया सैल



अदित्य नेर्लेकर



निहारिका देशमुख



अर्चिशा यादव



सृष्टी बकारे



हीना मिस्त्री

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सिटी इंटरनॅशनल स्कूल औंध, वानवडी, सातारा रस्ता शाळेचा सीबीएसई बोर्डाचा दहावीच्या परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला.

वानवडीच्या अर्चिशा यादव व सृष्टी बकारे ह्या दोन्ही विद्यार्थिनींनी ९७ % गुण मिळवत शाळेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. परीक्षेस बसलेल्या एकूण ७९ विद्यार्थ्यांपैकी १३ विद्यार्थी ९०% च्या वर गुण मिळवून गुणवत्ता यादीत आले असून ४४ विद्यार्थ्यांना डिस्टींक्शन मिळाले आहे, तसेच १९ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

**शाळेतील पहिले ३ विद्यार्थी पुढीलप्रमाणे :** अर्चिशा यादव ९७%, सृष्टी बकारे ९७%, हीना मिस्त्री ९५.४%

**सातारा रोड** शाखेतील अनया सैल या विद्यार्थिनीने ९६. ८% गुण मिळवत शाळेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. या शाळेतील परीक्षेस बसलेल्या एकूण १३१ विद्यार्थ्यांपैकी ३१ विद्यार्थी ९०% च्या वर गुण मिळवून गुणवत्ता यादीत आले असून ५७ विद्यार्थ्यांना डिस्टींक्शन मिळाले आहे, तसेच ३३ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. अनया सैल ९६. ८%, आदित्य नेर्लेकर ९६. ६%, निहारिका देशमुख ९५.२ %

**औंध** येथील सिटी इंटरनॅशनल शाळेचा श्रेयश बच्छाव विद्यार्थ्याने ९७ टक्के गुण मिळवत शाळेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. परीक्षेस बसलेल्या एकूण ६३ विद्यार्थ्यांपैकी १६ विद्यार्थ्यांनी ९० टक्केच्यावर गुण मिळवून गुणवत्ता यादीत आले असून, २६ विद्यार्थ्यांनी विशेष गुणवत्ता मिळविली आहे. तसेच १५ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

विद्यार्थ्यांचे नाव टक्के %, श्रेयस बच्छाव ९७, अवंतिका व्यंकटेश ९६.६, रिचा शानबाग ९६.५ विद्यार्थ्यांचे, पालकांचे व शिक्षकांचे शाळेचे अध्यक्ष मौलिक दीक्षित यांनी मन:पूर्वक अभिनंदन केले आहे.